# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी २२६२०६०१, ३०२३३४८४, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७
E Mail-1)desk15dte@gmail.com 2) System@dte.org.in 3) Desk15@dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक:-१५/अर्थस/ईबीसी ऑनलाईन /२०१६-१७/१८८
दिनांक :- 2 JAN 2017

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय:-"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीयोजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपुर्ती करण्याबाबत.
(संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्जाबाबत)

संदर्भ :-१) उ. व तं.शि. विभागाचे शासन निर्णय क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३.१०.२०१६.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना व डॉ पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना" "ऑनलाईन" पध्दतीने अर्ज भरून घेण्याची मुदत दि. २१ ऑक्टो. २०१६ पासून ते ३० डिसें. २०१६ पर्यंत विद्यार्थ्यांना देण्यात आलेली असून सदर विद्यार्थी नोंदणी प्रक्रीया बंद झालेली आहे. परंतु विशेष ठोस कारणास्तव विहित मुदतीत अर्ज सादर करणे शक्य झाले नाही अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन एक विशेष बाब म्हणून (उदा. विद्यार्थी नोंदणी करणे, विद्यार्थ्यांना मान्यता देणे, अर्जाची छाननी करणे ई.) आवश्यक सुविधा विभागीय कार्यालयाच्या लॉगीन (Login) मध्ये दि. ०९/०१/२०१७ पर्यंत उपलब्ध करून दिलेली आहे.

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी ज्या विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून मान्यता द्यावयाची आहे. अशा विद्यार्थ्यांचे अर्ज ठोस कारणासह प्राचार्याचे अभिप्रायासह प्राप्त करून घ्यावेत व आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण म. रा. मुंबई.

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/इबीसी/२०१७/ 42
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक- 4 JAN 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-
१) प्राचार्य, सर्व संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या परिपत्रकाचे अवलोकन करुन त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात यावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.